महाराष्ट्र शासन
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.
कार्यालय- उप-कुलसचिव (विद्या) , महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२१५
ई-मेल dracdmpkv2013@rediffmail.com
पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर. पिन- ४१३ ७२२.

# -: जाहीर निवेदन:-

## ४० वा पदवीप्रदान समारंभ

**(विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि. अहिल्यानगर " **४० वा पदवी प्रदान समारंभ** " माहे फेब्रुवारी-२०२७ मध्ये आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावित पदवीप्रदान समारंभासाठी ज्या पदवीधारक स्नातकांनी दि. ३० जून, २०२६ पर्यंत पदवी अभ्यासक्रम तसेच दिनांक ३१ जूलै, २०२६ पर्यंत पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी परीक्षा उत्तीर्ण असलेले अंतिम गुणपत्रक (Transcript)/ नोटीफिकेशन प्राप्त केले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधीत महाविद्यालयाकडे / विद्यापीठाकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ पर्यंत सादर करावेत.

अर्जासोबत गुणपत्रकाची (Transcript)साक्षांकीत प्रत तसेच नियंत्रक, मफुकृवि, राहुरी यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया, मफुकृवि, येथील खाते क्रमांक **३९३१९१३४८५५**आय. एफ. एस. सी. क्रमांक **SBIN0003239** मध्ये ऑनलाईन / ऑफलाईन पद्धतीने शुल्क भरणा केलेल्या रकमेची स्वसाक्षांकीत पावती (ऑनलाईन भरणा केल्यास Successful Transaction / Transaction Number / UTR number च्या स्क्रीन शॉटची प्रिंट आणि ऑफलाईन भरणा केल्यास बँकेच्या Deposit Slip) ची प्रत जोडावी. अर्जांवर शुल्क भरण्याकरिता QR Code उपलब्ध करण्यात आलेला आहे.

१. पदवीप्रदान समारंभासाठी स्वत:
उपस्थित राहु इच्छिणाऱ्या स्नातकांसाठी **(In person)** शुल्क : रुपये **१,०००/-**
२. पदवीप्रदान समारंभासाठी
उपस्थित राहु न शकणाऱ्या स्नातकांसाठी **(In absentia)** शुल्क : रुपये **१,५००/-**

या संबंधीचे छापील अर्ज उप-कुलसचिव (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी यांचे कार्यालयात तसेच विद्यापीठाच्या शासकीय व संलग्न महाविद्यालयात कार्यालयीन वेळेत विनामुल्य उपलब्ध होऊ शकतील. तसेच, विद्यापीठाच्या www.mpkv.ac.in / (https://mpkv.ac.in/Student/Circular) या संकेत स्थळावर उपलब्ध होतील.

**विशेष सूचना**:- सदर जाहीर निवेदन विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये व त्यांना पदवीप्रदान समारंभासाठी अर्ज विहित वेळेत भरता यावा, यास्तव विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळ www.mpkv.ac.in यावर अगोदर प्रसिध्द करण्यात येत आहे. ४० व्या पदवीप्रदान समारंभाची तारीख निश्चित झालेनंतर, विद्यार्थ्यांना अवगत करण्यासाठी स्वतंत्र जाहीर निवेदन प्रमुख वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सबब, सर्व महाविद्यालयांनी जाहीर निवेदन हे आपल्या सूचना फलकावर प्रसिध्द करावे व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

जा.क्र. विद्या-१०/४० वा प्रप्रस/ ५०८० /२०२६
दिनांक : २३ /१०/२०२६

( राजेंद्रकुमार पाटील )
कुलसचिव